जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १११ दिनांक - १३/०२/२०२४**

कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## किरकोळ भांडणाच्या रागातुन बिल्डींगमध्ये चोरी करणा-या महिला आरोपीला केले जेरबंद

दि.०२/०२/२०२४ रोजी फिर्यादी यांचे घर बंद असताना घराचे लॉक अज्ञात चोरटयाने उघडुन बेडरुम मधील कपाटातील सोन्याचे मंगळसुत्र, रोख रक्कम असा एकुण ३७,०००/- रु. कि मुद्देमाल चोरी करुन नेला म्हणुन दिवसा घरफोडीचा गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयातील फिर्यादी यांच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने तपास करित असताना घराची चावी घराच्या बाहेर ठेवत होता का,तसेच त्याच्याकडे घरी नेहमी बिल्डींगमधील कोण गप्पा मारण्यासाठी येत होते,तसेच त्याचे दागिणे घरात कोठे ठेवता याबाबत कोणाला माहिती होती,तसेच त्याचे कोणाशी वाद झालेले आहेत का,त्याच्या घराची चावी कोणाकडे ठेवण्यासाठी देता का,किंवा त्याचे घराचे कुलूप कोणाला वापरण्यासाठी दिले होते का याबाबत तपास केला असता त्यांनी त्याच्या बिल्डींग मध्ये फलॅट नं.२०२ मध्ये राहणारी महिला नामे सलमा शेख, वय.२४ वर्षे रा.कोंढवा पुणे हिने तिच्या घराला लावण्यासाठी कुलूप नेले असल्याचे,तसेच तिला घरात कोठे दागिणे ठेवत असता याबाबत माहिती असल्याचे सांगितले.

सदर संशयीत महिला हीस पोलीस ठाणे येथे बोलावुन कौशल्यपुर्ण तपास केला असता तिने फिर्यादी यांच्या सोबत वाद झाले होते.त्यामुळे दि.०२/०२/२०२४ रोजी फिर्यादी यांच्या घराची चावी त्यांनी बाहेर ठेवल्याचे माहिती असल्याने ती घेवुन घरात जावुन कपाट उघडुन चोरी केल्याचे कबुल केले. सदर महिल्याच्या घराची घरझडती घेतली असता चोरी केलेले दागिणे तिच्या घरातील बंद वॉशिग मशीनमध्ये लपवुन ठेवल्याचे मिळुन आल्याने ते जप्त करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्वे प्रादेशिक विभाग श्री.मनोज पाटील,मा,पोलीस उप आयुक्त.परि.०५ श्री.आर राजा,मा.सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग श्री.शाहुराव साळवे कोंढवा पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संतोष सोनवणे,पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.मानसिंग पाटील,यांच्या मार्गदर्शन व सुचनाप्रमाणे सहा.पोलीस निरीक्षक लेखाजी शिंदे, दिनेश पाटील,पोलीस अंमलदार अमोल हिरवे, शहिद शेख, संतोष बनसुडे, लक्ष्मण होळकर, अभिजीत रत्नपारखी,जयदेव भोसले,विकास मरगळे,राहुल थोरात,सुहास मोरे, अभिजीत जाधव,आशिष गरुड, रोहित पाटील यांनी केली आहे.